# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१ - २७२१०१०,          विस्तार क्र.२२५          proumc321@gmail.com


दिनांक : १८/०७/२०२३

## प्रेसनोट

शहरातील रस्त्यांवरील निर्माण झालेले खड्डे भरण्यासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या उपस्थितीत आज व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेवुन पुर्ण शहराचा आढावा घेण्यात आला. खड्डे भरण्यासाठीच्या विविध पद्धतीबाबत चर्चा करण्यात आली. पाऊस सतत पडत असल्याने खड्डे भरण्यामध्ये अडथळे येत आहेत. तथापी सदर काम अविरसपणे केले जात आहे. सध्या पावसाचा ऑरेन्ज अलर्ट असल्यामुळे खडी व ग्रीटद्वारे खड्डे भरणे सयुक्तीक असल्याचे शहर अभियंता यांनी निर्दशनास आणले. त्यानुसार खड्डे त्वरित भरण्याबाबत व त्यासाठी मनुष्यबळाची वाढ करण्याबाबत तसेच पावसाचे प्रमाण कमी झाल्यानंतर सिमेंट क्रॉंक्रीट रस्त्यावरचे ट्रेन्जपट्‌ट्या, रेडिमिक्स क्रॉंक्रीटीकरण (m60 ग्रेड) भरण्याबाबत मा. आयुक्त यांनी संबंधित ठेकेदार यांना सुचना दिल्या. तसेच शहरातील विविध भागांकरिता नियंत्रण अधिकारी म्हणुन अतिरिक्त आयुक्त, सर्व उपआयुक्त, तसेच कॅम्प नं १ ते ५ चे सर्व प्रभाग अधिकारी यांना जबाबराऱ्या सोपविण्यात आल्या त्याचप्रमाणे मा. आयुक्त यांनी आज शहरांच्या विविध भागात रस्त्यांची पहाणी केली व खड्डे भरण्याच्या संबंधितांना सुचना देण्यात आल्या.

१८/७/२३

(छाया डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत:- माहितीस्तव सादर
मा. आयुक्त तथा प्रशासक

प्रत
१) पत्रकार बांधव
२) सिटीझन जर्नालिस्ट मा.न.पा.